लेखन - श्रद्धा वझे

कथेचं नाव -- 'रिटर्न गिफ्ट'

'कसली लकी आहे नं मी...सुनीलला आवड आहे फिरायची म्हणून मी जग पहातेय...किती देश झाले असतील आत्तापर्यंत?...जाऊ दे कशाला मोजायचे...प्रत्येक देशाची वेगळी खासियत...उगाच तुलना करत बसायचं नाही...आला क्षण एन्जॉय करायचा...उद्या बर्थडे माझा...सुनील नं कसलं भारी गिफ्ट दिलंय मला...' अनेक विचार मनात सुरू असताना सपना नं अगदी कृतज्ञपणे सुनीलकडे पाहिलं...बसमधल्या सीटवरच्या हेडरेस्ट वर डोकं ठेवून सुनील एक स्नॅप घेत होता...सुनील तसा बराच अबोल...तो आणि त्याचा कॅमेरा...कॅमेऱ्यातून जगाकडे बघायचा सुनील...हौशी फोटोग्राफर असला तरी दरवर्षी त्यानं टूर मध्ये काढलेले दोन-तीन फोटो तरी कोणत्या ना कोणत्या फोटो एक्झिबिशन मध्ये डिस्प्ले व्हायचेच...माणसांपेक्षा फोटोग्राफीत रमायचा सुनील...

सपना मात्र बोलघेवडी होती...त्याच्या अबोलपणाची कसर सपनाच भरून काढायची, घरी आणि दारीही...तिची पट्कन दोस्ती व्हायची कोणाशीही...आत्ताही टूर मध्ये तिनं सुरुवाती पासूनच सगळ्या ग्रुपशी मस्त जुळवून घेतलं होतं... कोणत्याही नवतरुणीइतकीच ती उत्साही असायची... परफेक्ट ड्रेसिंग सेन्समुळे ही वर्किंग वुमन चारचौघीत कायमच उठून दिसायची...टूर गाईड अमेय सुद्धा एकदम म्हणून गेला होता..."सपना मॅडम, तुम्हाला मॅडम म्हणणं जरा अवघडच जातंय"...त्यावर ती खळखळून हसत म्हणाली, "त्यात काय मग, म्हण की मला सपना बिनधास्त, माझे सगळे फ्रेंड्स मला 'ए' सपनाच म्हणतात, त्यातलाच तू एक"......'अरेऽऽ हसताना ही कसली गोड दिसतेय ना, कोण म्हणेल हिला दोन मुलांची आईऽऽ'....अमेयच्या मनात विचार आला खरा, पण त्यानं लगेच तो झटकून टाकला...त्याच्या हातात सगळ्या टूर मेंबर्सची नावा-गावासकट कुंडली होती, त्यामुळे उद्या सपनाचा वाढदिवस आहे, हे त्याला सुद्धा माहीत होतं...टूर कंपनीतर्फे संपुर्ण प्रवासात सगळ्यांचे स्पेशल डेज् नेहमीच साजरे केले जायचे... ."डन मॅडम, मी तुम्हाला आजपासून नावानंच हाक मारेन...सुनील सरऽ चालेल ना तुम्हाला?"..हसत हसत अमेयनं सुनील ला विचारलं...सुनीलनं काही न बोलता एक स्माईल देत, त्याला थम दाखवत संमती दिली.. सुनीलला त्यात काहीच गैर वाटलं नव्हतं...

सुनीलनं त्याच्या बेटर हाफच्या बर्थडे साठी टूर कंपनीचा मुद्दाम हा असाच प्लॅन निवडला होता की, त्यामुळे सपनाच्या वाढदिवसाच्या दिवशी ते दोघे थेट स्वित्झलँड मध्ये असणार होते...सपना खूप एक्साईट झाली होती...अत्यंत प्रेमानं तिनं सुनील चा हात हातात घेतला...एसी बस असूनही एक क्षणभर तिला सुनील चा हात काहीसा गरम असल्यासारखा वाटला...पण उगाच काहीतरी मनाचे खेळ म्हणत तिनं त्याचा हात अजूनच गुरफटून घेतला आणि ती बसच्या मोठ्ठ्या खिडकीतून बाहेर बघत राहिली...आपण काचेतून बघतोय याचा विसर पडावा इतक्या त्या काचा स्वच्छ आणि पारदर्शक होत्या...त्यामुळे धावत्या बस मधूनही प्रत्येक गोष्ट तिला नजरेत साठवता येत होती...

पॅरिस मागे पडत होतं...लंडनहून पॅरिस ला येताना त्यांनी युरोपातल्या जगप्रसिद्ध युरोस्टार ट्रेनच्या वेगवान प्रवासाचा आनंद घेतला होता...आता मात्र मर्सिडीझ बसनं सगळे टूर मेंबर्स स्वित्झलँडला पोहोचणार होते...रस्त्याच्या दोन्ही बाजूला मैलोन् मैल पसरलेली हिरवळ, पोपटी-पिवळी शेतं, अधूनमधून दिसणारी फ्रेंच स्टाईलची लाकडी घरं सरसर मागे सरकत होती...भोवतालची हिरवाई नजरेला, मनाला सुखद गारवा देत होती...पण मन कसं असतं ना मध्येच ते कधीही कुठेही प्रचंड वेगानं जातं...जगाच्या एका टोकापासून अगदी दुसऱ्या टोकापर्यंत...त्याच वेगानं सपना एका क्षणात मुंबईत तिच्या घरी पोहोचली..."मम्मा, आईस्टाईन स्वित्झलँडचाच सिटीझन होता, मी पाहिलंय गुगलवर आणि तुम्ही चार्ली चॅप्लिनच्या स्टुडिओ ला सुद्धा विझिट करणार आहात नाऽऽ...मम्मा, खूप फोटो काढ हं ऽऽ" ...निघताना जाई गळ्यात पडून म्हणाली होती...तर "पप्पा,येताना तू स्विस बँकेत आपलं अकाउंट उघडून ये, मी बघ फ्युचर मध्ये इतके पैसे मिळवेन की आपल्याला स्विसबँकेतच ठेवायला लागतील ते पैसे"...मोठ्यांदा हसत जयनं जाई ला टाळी दिली होती...किती मस्त आहेत ना माझी बाळं...युरोपमधल्या प्रवासात मध्येच सपना ला दोघांची आठवण आली... 'ताईनं फोर्स केला म्हणून पहिल्यांदाच फक्त दोघेच निघालो टूरवर...नाहीतर आजवर दोन्ही पिल्लांना घेतल्याशिवाय एकही ट्रिप झाली नव्हती'...सपना विचारात मग्न होती..."अगं, होऊ दे सवय त्या दोघांनाही आणि आता लहान आहेत का ती दोघं...राहतील

माझ्याकडे...अशीही दिवसभर असणार आहेत का ती घरात...जाईकडे थोडं लक्ष द्यावं लागेल...पण जयचं काय, चांगली मिशी फुटलीये त्याला आताऽऽ"...ताई असं म्हणताच जयनं सुद्धा रणवीरसारखा कोवळ्या मिसरुडीवरून हात फिरवला...."मम्मा...मै मेरी बहेन की रक्षा करूँगा, तुम एन्जॉय करना तुम्हारी टूर"....अगदी फिल्मी स्टाईल दोन्ही पोरांनी आई-बाबाला हसत-खेळत टाटा-बाय-बाय केलं होतं... तरीही निघताना सपनाचे डोळे भरून आले होतेच...आत्ताही मुलांच्या आठवणीनं तिच्या डोळ्याच्या कडा पाणावल्या ...

"फ्री वॉशरूम स्टॉपऽऽ"....अमेयनं बसमधल्या माईक वरून घोषणा केली...सगळे पेंगाळलेले टूर मेंबर्स जागे झाले... "कोणाला युरो जास्त झाले असतील तर त्यांनी ते मला द्या...पण वॉशरूम ला देऊ नका"...हसत अमेयनं टिपिकल टूर गाईड चा डायलॉग मारला...सगळेच जण इच्छा असो वा नसो, वॉशरूम फुकट आहे म्हणून वापरून आले...कारण प्रत्येक वेळी केवळ नैसर्गिक अधिकारासाठी एक युरो म्हणजे ऐंशी ते शंभर रुपये मोजणं आपल्या भारतीय पर्यटकांना तरी जरा कठीणच जायचं...."आर यू ओके, सुनील?" आधीच शांत असलेला सुनील आज आणखीनच शांत वाटल्यानं सपनानं त्याला विचारलं..."यस डार्लिंग"...असं म्हणत त्यानं हलकासा रिप्लाय दिला...तरीही सपनाला कळलं होतं की सुनीलचं नक्की काहीतरी बिनसलंय ...

डोंगर, हिमशिखरं, दऱ्या, हिरवीगार रानं, निळसर पाण्याची तळी, थंडगार वातावरण यामुळे सपना खूपच आनंदून गेली होती...निसर्गाचा आनंद घेतच सगळ्यांनी हॉटेल गाठलं...रूमवर पोहोचल्यावर समोर दिसणाऱ्या भल्या मोठ्या तळ्याच्या बॅकग्राउंडवर सपनानं भरपूर सेल्फी काढले...पण सुनील मात्र लगेच बेडवर आडवा झाला...त्याला चांगलाच ताप भरला होता...सपना थोडी काळजीत पडली...तिनं काहीही न बोलता रूम वर सामान सेट केलं...सुनीलची अशी अवस्था बघून तिचाही मूड गेला होता...रात्री ही जोडगोळी डिनर ला खाली आली नाही हे पाहून टूर गाईडची ड्युटी म्हणून अमेयनं त्यांना रूमवर एक कॉल केला...सुनीलला फिव्हर असल्याचं त्याला कळलं तेव्हा लगेच अमेय त्याला भेटायला त्यांच्या रूमवर आला...

"डोन्ट वरी, सपना, टूर मध्ये अशा गोष्टी होतातच, इतकं काय मनाला लावून घेतेस, आम्हाला सवय आहे त्याची...सर विल बी ऑल राईट टूमॉरो मॉर्निंग..." कसलेल्या टूर गाईड प्रमाणे अमेयनं सपनाला धीर दिला..."सरांना इच्छा नसेल तरी तू डिनर करून घे, चल मी तुला कंपनी देतो"...सुनीलला औषध देऊन सपना अमेय बरोबर ग्राउंड फ्लोअर च्या डायनींग हॉल मध्ये आली...एव्हाना इतर सगळेच जण जेवून आपापल्या रूम वर गेले होते..."कसला विचार करतेयस?"...सपनाचं जेवणात लक्ष नाही हे पाहून अमेयनं अत्यंत आपुलकीनं तिला विचारलं...त्यानं विचारताच तिनं मान वर केली पण त्यावेळी तिच्या डोळ्यात पाणी तरारलं होतं..."ओह गॉड कसली सेंटी आहेस गं तूऽऽ...हा टूर गाईडचा टीशर्ट नसता ना माझ्या अंगावर, तर तुला आत्ता जवळ घेतलं असतं मीऽऽ आणि तुझे डोळे पुसले असते"..."अरेऽऽ सुनीलनंच प्लॅन केली होती ही टूर माझ्या बर्थडे साठी आणि आता इकडे येऊन तो आजारी पडलाय...मला माझा बर्थडे एन्जॉय करायचाय अमेय...रूमवर बसून रडत रहायचं नाहीये आणि ते सुद्धा स्विझलँडला आल्यावर"...."त्यात काय इतकं, सरांना बरं वाटेल उद्यापर्यंत आणि अगदीच विकनेस जाणवला तर राहतील ते हॉटेल वर...आपण एन्जॉय करू तुझा बर्थडे... इतकं काय टेंशन घेतेस?" .... सपनाचा गेलेला मूड पुन्हा आणण्याचा अमेय प्रयत्न करत होता..."हं".... सपनानं डिश युझ्ड प्लेट्स मध्ये ठेवली..."गुड नाईट सपना अँड जस्ट रिलॅक्स, सरांना बरं वाटेल नक्की...नही तो हम हैं नाऽऽ... एन्जॉय करूया उद्या...आणि बाकीचे सगळे आहेतच की आपल्या ग्रुपमधले"... त्याच्या हम हैं ना ऽऽ अशा नॉटी बोलण्यानं सपनाच्या ओठांवर हलकंसं हसू पसरलं...."ए तुला सांगूऽऽ मुंबई एअरपोर्ट पासून तुला बघतोय...स्माईल कसलं मस्तय तुझं...तू अशीच हसत रहा...हसताना खूप छान दिसतेस तूऽऽ.. कशाला डोळ्यात पाणी आणायचं उगाच...एन्जॉय करायला आली आहेस तर एन्जॉय करायचं"...अमेय तिला रूमपर्यंत सोडायला आला होता...चालता चालता तो सहजच तिच्या अगदी जवळ आला....त्याला एका गोष्टीची जाणीव होती की फक्त हॉटेल मधल्या रूम्स सोडल्या तर जगभरातल्या हॉटेलस् मध्ये सगळीकडे सीसी कॅमेरे बसवलेले असतात...तरीही तो मिश्कीलपणे तिला म्हणाला..."हा टूर गाईड चा टीशर्ट आड येतोय नाहीतर आत्ता हग करून, नाही नाही घट्ट मिठी मारूनच तुला गुड नाईट केलं असतं"...."चलऽऽ इतका आगाऊ असशील असं वाटलं नाही हं अमेय...आणि काय रे लहान आहेस ना तू माझ्याहून, शहाण्या"...एक चापट मारत ती हसतच त्याला म्हणाली..."फक्त चार वर्षांनीच हं मॅडम ऽऽ आणि लहान कसला....अबाऊ एटीन आहे मी...माझंही लग्न झालंय... चांगला अनुभवी आहे मीऽऽ"...डोळा मारत तो म्हणाला..."आणि तुला कोण म्हणेल गं माझ्याहून मोठी, कसली भारी दिसते आहेस अजूनही...बायका मिडल एज् मध्ये आणखीनच सेक्सी दिसतात बरं ऽऽ " ...."ओहो ऽऽ बराच अभ्यास दिसतोय तुझा...बायकांबद्दल"..."मॅडम, लास्ट फिफ्टीन इअर्स पासून या क्षेत्रात आहे, सतत जग फिरतो

असतो मी, इतकं तर कळणारच ना...आणि टूरला येणारे लोक्स काही भजन करायला येत नाहीत...त्यामुळे नजरेला सहज दिसतं ते पहातो आम्ही"....दबक्या आवाजात, डोळे बारीक करत, हसत-हसत अमेय म्हणाला..."फारच अभ्यासू आहेस बाबाऽऽ तू "....त्या तासाभरात दोघांची मस्त मैत्री झाली होती आणि दोघांनाही एकमेकांची कंपनी आवडली होती...दोघेही मोकळे, बिनधास्त असले तरी मॅच्युअर्ड होते...त्याला टाटा-बाय-बाय करत टेंशन फ्री झालेली सपना रूम मध्ये शिरली...टूर मधल्या या बर्थडे गर्ल चा मूड छान झालेला बघून अमेयला सुद्धा एक टूर गाईडचं कर्तव्य पार पाडल्याचं समाधान मिळालं होतं...

टॅब्लेट्स घेतल्यानं सुनीलला छान झोप लागली होती...पण झोपेची वेळ टळून गेल्यानं बराच वेळ झाला तरी सपनाला काही केल्या झोप येत नव्हती...मग तिनं अमेयला व्हॉट्स अप केलं...'थँक्स फॉर नाईस कंपनी अमेय'...'वेलकम सपनाजी, सरांना बरं वाटेल, नाहीतर आपण एन्जॉय करू, डोन्ट गेट अपसेट,ओकेऽऽ?'...'ओकीज्'...रात्रीचे पावणे बारा वाजत आले होते...'सोऽऽ हॅपी बर्थडे स्वीट स्विस गर्ल...गुड नाईट अँड एसडी'...'नुसत्या शुभेच्छा नकोत, माझं गिफ्ट कुठेय?'...'उद्या देतो की मॅडम...पण रिटर्न गिफ्ट मिळणार असेल तरच'....त्यानंतर त्यानं किस, बदाम असलेले स्माईलीज् तिला पाठवले...हसत थम दाखवत सपनानं त्याला अर्धचंद्र पाठवला...त्यावर 'हमने सपना देखा हैं, कोई अपना देखा हैं'...असा मेसेज करून अमेयनं सुद्धा तिला अर्धचंद्र पाठवला...हा चांगलाच मुरलेला दिसतोय नै...झोपताना सपना तिचं मॅरीड स्टेटस क्षणभर का होईना, पण विसरली होती खरं ....तिच्यातली आई, पत्नी, काकू, मावशी, वर्किंग वुमन अशा सगळ्या रोल्स ना तिनं मागे सारलं होतं ... स्वित्झलँड ला पोहोचल्यापासून जणू काही ती कॉलेज गोइंग मुलगी झाली होती...रजई मध्ये गुरफटून घेत गोड हसत ती निद्रेच्या अधीन झाली....

स्वित्झलँडमधली आजची सकाळ खूप प्रसन्न होती...भारतात कधीच उजाडलं होतं... जगमित्र असलेल्या सपनावर सोशल मिडियातून बर्थडे विशेज् चा पाऊस पडला होता... दोन्ही मुलांनी व्हिडीओ कॉल करून तिला विश केलं तेव्हा ती जास्तच खुश झाली...सुनीलनं सुद्धा सकाळी उठल्यावर लगेच तिला शुभेच्छा दिल्या...त्याला बरं वाटत असलं तरी तो दिवसभर साईट्सिन कॅरी करु शकेल की नाही ह्याबद्दल दोघेही साशंक होते...शेवटी सुनीलनं रुमवरच थांबायचं ठरवलं....आणि सपना एकटीच बसमध्ये जाऊन बसली...सगळ्यांच्या शुभेच्छांचा स्वीकार करत, सुनीलबद्दलच्या चौकशीला स्माईल देत ती रिप्लाय करत होती...तिच्या चेहऱ्यावर हसू असलं तरीही आतून ती काहीशी नाराज असल्याचं अमेयनं ताडलं होतं...'गणपती बाप्पा मोरया' चा नारा देत त्यानं बस हाकली...

मग मात्र दिवसभर अमेय तिला जपत राहिला...हे तो मुद्दाम करत होता असं नाही, तर त्याच्याकडून ते सहज होत गेलं...कधी तिला पुढे ड्रायव्हरच्या माईकवाल्या सीट वर बसव, कधी थट्टा-मस्करी करत तिला हसव, ती जेवलीये की नाही याची चौकशी कर असं लक्ष देत राहिला...मध्येच तिचा डोळा लागल्यावर तिच्या चेहऱ्यावर उन्हाची तिरीप आलेली त्यानं पाहिली...तेव्हा बसमधल्या मागच्या मेम्बर्सशी बोलायचं निमित्त करून तिच्या खिडकीचा पडदा त्यानं सारला...तेव्हा त्याच्या हलक्याशा धक्क्यानं क्षणभर सपनाची झोप चाळवली पण गाढ झोपेत बाजूला सुनील आहे समजून ती बाजूच्या सीटवर काहीशी कलली... बाजूला कोणीच नसल्यानं ती झोपेत कलंडेल म्हणून अमेय पट्कन तिच्या बाजूला जाऊन बसला...झोपेतच त्याच्या पाठीचा आधार घेऊन सपना पुन्हा शांत झोपली...जाग आली तेव्हा बाजूला सुनील नाही तर टूर गाईड अमेयला बघून ती काहीशी ओशाळली खरी, पण "जस्ट चिल" असं नजरेनंच म्हणणाऱ्या अमेयकडे पाहून ती खुदकन हसली...मग तिच्या लाईफ पार्टनर शिवाय आलेल्या या बर्थडे गर्लला एकटं वाटू न देता तो तिचा मूड सांभाळत राहिला...लंच नंतर युरोप मधल्या सर्वात उंच अशा टिटीलीस हिमशिखरावर स्वारी करायला संपुर्ण ग्रुप निघाला तेव्हा अमेय सतत सपनाची सोबत करत होता..कारण आज ती एकटीच होती... इतक्या उंचीवर चढताना काही वेळा कुणाला चक्कर किंवा श्वसनाचा त्रास होण्याची शक्यता असते...शिखरावर नाही पण ट्रॉलीच्या झटक्यानं सपनाला एक क्षणभर गरगरलं तेव्हा अमेयनं हात देत तिला पट्कन सावरलं... शेवटी सर्वात उंच शिखरावर पोहोचल्यावर अमेयनं सगळ्या मेम्बर्सच्या घोळक्यात ..."हॅपी बर्थडे स्विस गर्ल"....म्हणत टूरतर्फे तिला शुभेच्छा आणि गिफ्ट्स दिल्या...सपना खूप खुश झाली होती...सुनील बरोबर नसला तरीही आजचा तिचा वाढदिवस अमेयमुळे अविस्मरणीय झाला होता...ती तरंगतच सगळ्यांबरोबर हिमशिखरावरून खाली आली..

दिवसभर थकल्यानं सगळेच जण पेंगत होते...बसमध्ये वायफाय होतं.. ते कनेक्ट करून सपना सगळे मेसेज पहात बसली ... सगळ्यांना रिप्लाय देत राहिली...दिवसभरात सुनीलशी सुद्धा तिनं दोन-चार वेळा चॅट केलं होतं..त्याच्या तब्येतीचे अपडेट्स घेतले

होते...ती मोबाईल मध्ये गुरफटलेली असतानाच त्यांचं हॉटेल आलं...खाली लॉबीमध्ये अमेयनं दुसऱ्या दिवशीच्या सूचना दिल्यावर सगळे ग्रुप मेंबर्स पांगले...सुनीलला भेटायचं निमित्त करून अमेय सपनाबरोबर कॉरिडॉरमधून चालत रूमपर्यंत येत होता...चालता-चालता खिशातून एक मोठं स्विस चॉकलेट काढून त्यानं सपनाच्या हातात ठेवलं..."हॅपी बर्थडे स्विस गर्ल, वन्स अगेन...हे माझ्याकडून" "ओह अमेय, थँक्स अ लॉट, यू मेड माय डे"....त्याचा हात हातात घेत अत्यंत लाघवीपणे तिनं अमेयला थँक्स म्हंटलं..."सपना, हे फ्लर्ट नाही...आम्ही प्रोफेशनली काम करत असलो तरी शेवटी माणूसच आहोत...मी पाहिलं, तुम्ही दोघे तुझा स्पेशल डे सेलिब्रेट करायला इतका खर्च करून इथवर आलात आणि सर आजारी पडल्यानं तुझा मूड ऑफ झाला...असे क्षण तर आमच्या दोघांच्या पर्सनल आयुष्यात कित्ती तरी वेळा येतात...मी हा असा कायम फिरतीवर असतो माझी वाईफ सुद्धा घरी असेच कितीतरी क्षण एकेकटीनं साजरे करते...का कुणास ठाऊक....काल डिनरच्या वेळी तुझा हिरमुसलेला चेहरा पाहून मला तिचीच आठवण झाली आणि ठरवलं मी, की आजचा तुझा दिवस आहे तो आनंदातच जायला हवा...म्हणून मी...."...."आय नो अमेय, अरेऽऽ आता हे एक्सप्लनेशन कशाला रे इतकं....बट रिअली थँक यू सो मच...आज तू मला खूप आनंद दिलास...यंदाचा माझा बर्थडे चक्क टिटीलीस वर साजरा झाला तो फक्त तुझ्यामुळेच... आय हॅव नो मोअर वर्ड्स तू एक्सप्रेस माय फीलिंगज्...आय अँम सो हॅपी टुडे"..."हो ना,बघ मी तर माझा शब्द पाळला... तुला बर्थडेचं गिफ्ट दिलं... मग माझं रिटर्न गिफ्ट कुठेय?"....डोळे मिचकावत तो म्हणाला... दोघे तिच्या रूम पर्यंत पोहोचले होते...सपनानं अमेयच्या डोळ्यातले मिश्किल भाव ओळखले ...त्याला हलकेच हग करत चवड्या उंचावत ती त्याच्या कानात कुजबुजली..."वॉन्ट रिटर्न गिफ्ट?"...त्यानं लगेच होकारार्थी मान डोलावली ..."ऑफकोर्सऽऽ"...मग तिनं अलगद त्याच्या गालावर ओठ टेकले..."थँक यू सो मच डिअर अमेय" असं म्हणत त्याच्या प्रतिक्रियेची जराही वाट न बघता एका क्षणात रुममध्ये जात ती तिच्या कोशात शिरली...त्या हलक्या किस मध्ये कोणतीही वासना नव्हती, प्रतारणा नव्हती, चोरटी भावना नव्हती की कोणताही उत्शृंखलपणा नव्हता...होता फक्त एकच छान, स्वच्छ, निखळ मैत्रीपूर्ण भाव 'रिटर्न गिफ्टचा'.....

-x-x-x-x-x--x-x-x-x-x--x-x-x-x-x--x-x-x-x-x--x-x-x-x-x--x-x-x-x-x--x-x-x-x-x--x-x-x-x-x--x-x-x-x-x--x-x-x-x-x--x-x-x-x-x-